अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | बुधवार
२.०९.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २१४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# केंद्राच्या धर्तीवर राज्यातील साखर कारखान्यांसाठी येणार 'सॉफ्ट लोन योजना'

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना पुढील गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम वेळेत देण्यास मदत व्हावी, या उद्देशाने केंद्रसरकारच्या धर्तीवर राज्यात 'सॉफ्ट लोन योजना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बुधवारी दिले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन पॉलिसी आणि उपपदार्थ निर्मिती धोरण निश्चित करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. साखर कारखान्यांची आर्थिक क्षमता वाढवण्यासाठी केवळ साखरेवर अवलंबून न राहता उपपदार्थांच्या निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सहकारी साखर कारखान्यांमधून तयार होणाऱ्या विविध उपपदार्थांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याची सूचना केली. ?या धोरणामुळे कारखान्यांमध्ये सौर ऊर्जा, सहवीज निर्मिती, इथेनॉल(१ जी), मल्टिफफीड, २जी इथेनॉल, सीबीजी, हरित हायड्रोजन, बायो बिटुमिन, जैव रसायने आणि एस.ए.एफ या घटकांच्या निर्मितीस गती मिळणार आहे असे स्पष्ट केले.

सॉफ्ट लोन योजनेमुळे साखर कारखान्यांची आर्थिक चणचण दूर होण्यास मदत होईल, शेतकऱ्यांचे एफआरपीचे पैसे वेळेत देणे शक्य होणार आहे. या बैठकीला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, वित्त विभागाचे सहसचिव माधव वीर, नियोजन विभागाच्या उपसचिव सविता जावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात भ्रष्टाचार

## १२ लाखाचे व्हेंटिलेटरची साडे बावीस लाखात खरेदी

## माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुखांचा गंभीर आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**अमरावती** – अमरावतीमध्ये जिल्हा स्त्री रुग्णालयात व्हेंटिलेटर स्फोट झाल्याने ३ बालकांचा मृत्यू झाला होता. याच प्रकरणावर बोट ठेवत कांग्रेस नेते आणि माजी मंत्री डॉ.सुनिल देशमुख यांनी गंभीर आरोप केला आहे. अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी २० व्हेंटिलेटर तब्बल दाम दुपटीने खरेदी करण्यात आल्याचा दावा डॉ.सुनिल देशमुख यांनी केला आहे.

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार करणार**

दरम्यान, १२ लाखांचे व्हेंटिलेटर २२ लाख ५० हजार रुपयात खरेदी करण्यात आले, असा दावा काँग्रेसचे सुनील देशमुख यांनी केला. शिवाय हॅमिल्टन उ-३ कंपनीचे २० व्हेंटिलेटर खरेदी केले. हे वाशीम येथील निर्मल एजन्सीकडून २२ लाख ५१ हजार रुपयात खरेदी करण्यात आले आहे. ज्या निर्मल एजन्सीचा पत्ता दिला त्या पत्त्यावर सध्या किराणा आणि मिरची पावडर, हळदीचे दुकान आहे. नागपूर येथील मार्क एजन्सीच्या कोटेशनमधे याच व्हेंटिलेटरची किंमत १२ लाख रुपये सांगितली आहे.

२० व्हेंटिलेटर घेतल्यास १० लाखात मार्क एजन्सी १ व्हेंटिलेटर द्यायला तयार होती. या संपूर्ण प्रकरणाची पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मी तक्रार करणार आहे, असं देखील सुनील देशमुख यांनी सांगितलंय.

दरम्यान, डॉक्टर राजेंद्र रुपनवर यांच्या आत्महत्येस कारणीभूत असणारे आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, आरोग्य उपसंचालक भगवान पवार यांच्यावर गुन्हा दाखल करावा, उपजिल्हा रुग्णालयाचे उपाधीक्षक लीला मदने आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांचे स्वीय सहाय्यक असल्याचा दावा करणाऱ्या प्रसाद कोंडे देशमुख यांच्यावर अटक करून तात्काळ कारवाई करावी, कुटुंबाला तात्काळ एक कोटीची मदत जाहीर करावी, कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी मिळावी, प्रकारणाची डखढ चौकशी व्हावी, या मागणीसाठी डॉक्टर रूपनवर यांचे नातेवाईक आणि ग्रामस्थ आक्रमक झाले आहे.

जर दोषींवर तात्काळ अटक करून कारवाई झाली नाही आणि मागण्या पूर्ण झाल्या नाहीतर आंदोलन अजून तीव्र करण्याचा इशारा कुटुंबीयांनी दिला आहे. सध्या फलटण उपजिल्हा रुग्णालयासमोर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### दिशा सालियन मृत्यू प्रकरणी सीबीआय चौकशीचे आदेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाच्या तपासाला बुधवारी महत्त्वाचे वळण मिळाले. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात एफआयआर नोंदविण्याचे आदेश देत तपासाची जबाबदारी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविली. दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करत सीबीआय चौकशीची मागणी केली होती. त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला. दिशा सालियनचा ८ जून २०२० रोजी मालाड येथील एका इमारतीत मृत्यू झाला होता.

# भरधाव कारने तीन महिलांना अक्षरशः हेवेत उडवलं

## एका महिलेचा जागीच मृत्यू, जळगावच्या चाळीसगाव-मालेगाव रस्त्यावरील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**चाळीसगाव** – जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगावमधून एक भीषण अपघाताची बातमी समोर आली आहे. चाळीसगाव मालेगाव रस्त्यावर भीषण अपघात झाला आहे.

यात भरधाव कारने बिलाखेड गावाजवळ तीन महिलांना अक्षरशः उडवले आहे. या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून दोन महिला अतीगंभीरित्या जखमी झाल्या असल्याची माहिती आहे. तर हा अपघात एवढा भयंकर होता की मयत महिला कारमध्ये पूर्णपणे अडकून पडलेली होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पुढील कारवाई सुरु करण्यात आली. तर जखमींना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बिलाखेड गावातील संतप्त गावकऱ्यांकडून चाळीसगाव मालेगाव रस्ता रोको आंदोलन दरम्यान, या अपघातानंतर बिलाखेड गावातील संतप्त गावकऱ्यांनी चाळीसगाव मालेगाव रास्ता रोको आंदोलन सुरु केलं. सोबतच रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकण्यासह सुरक्षा फलक लावण्याची मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली.

या रस्ता रोको आंदोलनामुळे दोन्ही बाजूने वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. परिणामी घटनास्थळी मोठी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी समजूत काढल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतात आहे. मात्र या दुर्दैवी अपघाताने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## दहशतवादाविरुद्ध लढ्याचे मोदींचे आवाहन

# शांघाय सहकार्य संघटनेत पाकिस्तानवर जोरदार टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**बिश्केक** – धोरण म्हणून परकीय देशांविरुद्ध दहशतवादाचा वापर करणाऱ्या देशांचा शांघाय सहकार्य संघटनेने (एससीओ) सामना केला पाहिजे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. तसेच दहशतवाद्यांचे वित्तपुरवठा आणि भरतीविरुद्धच्या सामूहिक लढ्यात 'दुटप्पी निकष' फेटाळून लावण्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदींचे वक्तव्य म्हणजे पाकिस्तानावर थेट निशाणा साधल्याचे दिसत आहेत.

पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि इतर अनेक जागतिक नेत्यांच्या उपस्थितीत मोदी म्हणाले की, दहशतवादी कारवाया मानवतेसाठी गंभीर आव्हान ठरत आहेत.

दहशतवादाचा धोरणात्मक साधन म्हणून वापर करणाऱ्या राज्यांना असा इशारा दिला पाहिजे की, दहशतवाद कधीही कोणासाठीही 'स्ट्रॅटेजिक ॲसेट' असू शकत नाही, असे नमूद करून ते म्हणाले की, भारताने सर्व तणाव आणि संघर्ष युद्धाच्या मैदानावर नव्हे, तर संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे सोडवण्याचे सातत्याने आवाहन केले आहे.

पंतप्रधानांनी दहशतवादी परिसंस्थेचे संपूर्ण उच्चाटन करण्याची गरज व्यक्त केली. यामध्ये दहशतवादी संघटनांना होणारा आर्थिक पुरवठा, भरतीची साखळी, आणि दहशतवाद्यांना मिळणारे सुरक्षित आश्रय यांचा समावेश आहे.

# ५.१४ लाख मतदारांपैकी २.१३ लाख नोंदी बाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मीरा-भाईदर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांमध्ये झालेल्या कथित गैरप्रकाराने खळबळ उडाली आहे.

तब्बल ५ लाख १४ हजार ९५५ मतदारांच्या यादीतून २ लाख १३ हजार ४५ मतदारांच्या नोंदी कायमस्वरूपी वगळण्यात आल्याचा दावा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केला आहे. मतदार याद्यांच्या एसआयआर पडताळणी प्रक्रियेतून ही धक्कादायक आकडेवारी समोर आल्याचे सांगत सरनाईक यांनी निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तत्कालीन मतदार यादीत ५ लाख १४ हजार ९५५ मतदार नोंदवले गेले होते. त्यानंतर झालेल्या प्रशासकीय छाननी व प्रत्यक्ष पडताळणीत २ लाख १३ हजार ४५ नोंदी कायमस्वरूपी बाद करण्यात आल्या. याशिवाय ४७ हजार ९०१ मतदारांचे मॅपिंग अद्याप प्रलंबित असून, त्यांची सुनावणी व खातरजमा केली जाणार आहे. तर ४८ हजार ३७९ मतदारांच्या नोंदींमध्ये तांत्रिक विसंगती आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. या आकडेवारीमुळे निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न निर्माण होत असल्याचे सरनाईक यांनी म्हटले.




# समृद्धी महामार्ग विकासाचा की दरोडेखोरांच्या दहशतीचा? माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा गंभीर सवाल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी समृद्धी महामार्गावर सातत्याने होणाऱ्या दरोडे, लुटमारीच्या आणि गुन्हेगारीच्या घटनांवर अत्यंत तीव्र संताप व्यक्त केला असून राज्य सरकार व पोलीस प्रशासनाच्या कारभारावर जोरदार ताशेरे ओढले आहेत.

मी स्वतः या महामार्गाने अनेकदा प्रवास केला आहे. प्रवासादरम्यान विविध ठिकाणी थांबलो असता नागरिक, प्रवासी आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी माझ्याकडे थेट तक्रारींचा पाढा वाचला. समृद्धी महामार्ग आता प्रवासासाठी अत्यंत धोकादायक बनला आहे. दिवसाढवळ्या आणि मध्यरात्री दरोडेखोर सुसाट सुटले आहेत, मात्र शासनाचे याकडे लक्ष नाही, अशा व्यथा नागरिकांनी माझ्याकडे बोलून दाखवल्या असल्याचे अनिल देशमुख यांनी यावेळी सांगितले.

समृद्धी महामार्गावर गुन्हेगारांची दहशत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सिन्नर तालुक्यातील मलढोण व इशिंगपूर येथे दरोडेखोरांनी लोखंडी धारदार वस्तू फेकून वाहनांचे टायर पंक्चर केले, चालकांना मारहाण करून लाखांचा ऐवज लुटला.

छत्रपती संभाजीनगरच्या व्यापाऱ्याचा पाठलाग करून, बंदूक व शस्त्रांचा धाक दाखवून सोन्याची साखळी व रोकड लुटण्यात आली. ट्रकमधून ५०० लिटर डिझेल चोरी, कोट्यवधी रुपयांच्या लशींची ट्रकमधून पळवा-पळवी, तसेच सराफा व्यापाऱ्यांचे सोने पळवण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत, असेही ते म्हणाले. गुन्हे कुठे आणि कोणत्या पद्धतीने घडतात, याचे तत्काळ मॅपिंग करून रात्रीच्या वेळी प्रत्यक्ष पो-लीस गस्त वाढवण्यात यावी.

आपत्कालीन यंत्रणा आणि महामार्ग पो-लीस प्रतिसाद वेळ सक्षम करण्यात यावा.

---

स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयातील

# पवित्र पोर्टलद्वारे ११ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी थेट निवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्थानिक स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालय, वरुड येथील ११ विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासनाच्या 'पवित्र पोर्टल' प्रणालीद्वारे मुलाखती शिवाय थेट शिक्षक पदावर निवड झाली असुन गुणवत्ता यादीच्या आधारे कोणत्याही मुलाखती शिवाय मिळालेल्या या थेट नियुक्त्यांमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असुन परिसरातुन या गुणवंतांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत पवित्र पोर्टलद्वारे पारदर्शक पद्धतीने शिक्षक भरती प्रक्रिया राबवली जात आहे. यामध्ये हिवसे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीत उत्कृष्ट गुण संपादन करत थेट नियुक्ती मिळवण्याचा बहुमान पटकावला. मुलाखती शिवाय गुणवत्तेच्या जोरावर मिळालेली ही निवड महाविद्यालयातील दर्जेदार अध्यापन, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासु वृत्तीचे फळ मानले जात आहे. या यशाचा आनंद व्यक्त करताना प्राचार्य किशोर तडस म्हणाले की, 'सध्या मुलाखतीशिवाय फेरीत आपल्या ११ भावी शिक्षकांची थेट निवड झाली असुन अजुन मुलाखती सहित प्रवेशफेरी आहे. या फेरीतही महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी पात्र ठरणार असुन, एकूण निवड यादीत हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे यापेक्षाही जास्त विद्यार्थी यशस्वी ठरतील असा ठाम विश्वास आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष अध्यक्ष नितीन हिवसे, सचिव विक्रम ठाकरे तसेच महाविद्यालयाच्या संचालिका डॉ.प्राची ठाकरे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देऊन शासकीय सेवेपर्यंत पोहोचवण्यात संस्थेचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले तसेच प्राचार्य किशोर तडस यांच्यासह प्राध्यापक भारती ठाकरे, प्रियंका इंगोले, सविता गलपट, राजु गोलाईत, आरती देशमुख व चेतना पाटील यांनीही सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील फेरीतील उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

---

जनता इंग्लिश स्कुलमध्ये

# रक्षाबंधन उत्साहपुर्ण वातावरणात साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाचे महत्त्व तसेच भाऊ, बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी, विश्वास आणि संरक्षणाची भावना याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनगटावर प्रेमाने राखी बांधुन रक्षाबंधनाचा आनंद साजरा केला.

यावेळी विद्यार्थिनींनी आपल्या घरी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या आकर्षक व सुंदर राख्यांची स्पर्धाही घेण्यात आली. विद्यार्थिनींनी विविध साहित्याचा वापर करुन



कल्पकतेने राख्या तयार केल्या होत्या. या स्पर्धेत विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला व कलागुणांना वाव मिळाला.

या उपक्रमातुन विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांचे महत्त्व समजले. संपुर्ण शाळेत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका आंडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

---

# पोलिसांकडूनच अमली पदार्थांची विक्री : राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंत्र्यांचा आरोप, २०२९ पर्यंत समूळ उच्चाटनाचा निर्धार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात अमली पदार्थांच्या वाढत्या खरेदी-विक्रीबाबत चिंता व्यक्त करतानाच पोलिसांच्या सहभाग आणि आशीर्वादाशिवाय हे शक्य नसल्याचा गंभीर आरोप मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांनी केला. पोलीसच अंमली पदार्थांची विक्री करत असतील तर हे रॅकेट रोखणार कसे? असा सवालही मंत्र्यांनी उपस्थित केल्याचे कळते.

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारच्या बैठकीत नशामुक्त भारत अभियानात २०२९ पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण मंजूर करण्यात आले. यावेळी काही मंत्र्यांनी वाढत्या अमली पदार्थ विक्रीचा मुद्दा उपस्थित करताना अनेक पोलीसच यात गुंतल्याची गंभीर तक्रार केली. मंत्रिमंडळ बैठकीत जवळपास सव्वातास या मुद्यावर चर्चा झाली. व्यापक जनजागृती आणि अंमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे.



---

# शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन

## कमी पावसामुळे मृग बहार संत्रा व मोसंबी बागांना मोठा फटका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यात यंदा कमी पावसामुळे मृग बहार संत्रा व मोसंबी बागांना मोठा फटका बसला असुन फळांची मोठ्या प्रमाणात गळती झाली आहे. पावसाअभावी बागांचे नुकसान झाल्याने संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. कमी पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन वरुड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा तसेच नुकसानग्रस्त मृग बहार संत्रा व मोसंबी, खरीप पीक, तुर, कापूस, सोयाबीन, मिरची, वांगी, टमाटर, मका, ज्वारी व इतर सर्व फळ पिकांचे



अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तातडीने अनुदान देण्यात यावे, अशी मागणी डवरगांव येथील अंकुश बोडनासे यांनी केली आहे.

यासंदर्भात अंकुश बोडनासे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केले आहे की, मृग बहार संत्रा व मोसंबी, खरीप पीक उत्पादनासाठी खत, औषध फवारणी, मजुरी, पाणी व इतर खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच कमी पावसामुळे फळगळ होऊन व खरीप पिके करपुन उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे शासनाने पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केल्या जात आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी उद्या २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय वरुड येथे धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे, या धरण आंदोलन शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

---

तालुक्यातील ३ हजार ९७ शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांवर टांगती तलवार

# 'मिशन सुधार' अभियान अंतर्गत अन्नपुरवठा विभागाच्या वतीने होणार कारवाही



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील बोगस व जास्त उत्पन्न असणारे सधन व्यक्ती सरकारी धान्याचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांना आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या अन्नपुरवठा विभागाच्या वतीने 'मिशन सुधार' अभियान राबविण्यात येत आहे.

आधार कार्ड डेटा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील माहिती, भुमी अभिलेख, कृषी विभागाचा ॲग्री स्टॅक, प्रादेशिक मोटर परिवहन विभाग आणि अन्य तांत्रिक आधारे किमान दहा निकषांच्या आधारे शिधापत्रिकाधारकांची तहसील कार्यालय कडुन पडताळणी करण्यात आली आहे. यामध्ये वरुड तालुक्यातील सद्य:स्थितीत जवळपास ३ हजार ९७ शिधापत्रिकाधारक लाभार्थी वगळण्यात येणार आहेत.




> तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांचे रेशनकार्ड ज्या दुकानात आहे, त्या रास्त भाव दुकानदारांकडे संबंधित याद्या देण्यात आलेल्या आहेत. ज्यांची नावे यादीत आहेत, त्यांनी आपली नावे पडताळणी करून घ्यावीत. जर नाव यादीमध्ये असेल, तर अशा लाभार्थ्यांनी योग्य कागदपत्रे व पुराव्यासह कार्यालयात उपस्थित राहून पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा) निखिल नलावडे यांनी केले आहे.

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत देशातील गरीब व गरजु लाभार्थ्यांना रेशनचे धान्य दिले जाते परंतु, कमी उत्पन्न दाखवुन श्रीमंत लोक या धान्याचा लाभ घेत आहेत आणि खरे गरजु या धान्यापासून वंचित राहत आहेत. खऱ्या व गरजु लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळवुन देण्यासाठी अन्नपुरवठा विभागातर्फे तहसील कार्यालय वरुड येथुन 'मिशन सुधार अभियान' राबविण्यात येत आहे. अभियानाची प्रमुख उद्दिष्टे व निकष रेशन वितरणातील काळाबाजार रोखण दुबार, मृत, स्थलांतरित आणि अपात्र लोकांची नावे रेशन कार्डमधुन वगळणे.

निश्चित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असणारे कुटुंबात आयकर भरणारी व्यक्ती असणे. शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असणारे, पेन्शनर, व्यावसायिक किंवा खाजगी नोकरी करणारे चार चाकी वाहने व मोठ्या गाड्यांचे मालक एकाच व्यक्तीचे नाव दोन वेगवेगळ्या कार्डावर किंवा वेगवेगळ्या राज्यात असणे.

रेशन कार्डमध्ये मृत व्यक्तीच्या नावाचा समावेश असणे किंवा लाभार्थी शहराबाहेर किंवा इतर राज्यात स्थलांतरित झाले ज्या ग्राहकांनी सलग सहा महिन्यांपासुन धान्याची उचल केलेली नाही. जे लाभार्थी अपात्र आढळतील, त्यांचा मोफत स्वस्त धान्याचा पुरवठा बंद केला जाणार आहे.

या अभियानामुळे गरीब, गरजु कुटुंबे आणि शासनाचा फायदा होईल. अपात्र श्रीमंत लोकांना या व्यवस्थाबाहेर काढल्यामुळे खऱ्या व वंचित गरजुंना धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच मृत, दुबार व बोगस नावांवर उचलले जाणारे हजारो टन धान्य वाचेल आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

# संपादकीय

**आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.**

## बुद्धीच्या देवाचा उत्सव आणि हरवलेला कॉमन सेन्स

गणेशोत्सव म्हणजे बुद्धी, विवेक, ज्ञान आणि मंगलतेचा उत्सव. श्रीगणेशाला विघ्नहर्ता आणि बुद्धीचा अधिपती मानले जाते. कोणतेही शुभकार्य सुरू करण्यापूर्वी प्रथम गणेशपूजन करण्यामागेही हाच संदेश आहे की, प्रत्येक कृती विवेकाने आणि योग्य विचाराने व्हावी. मात्र आज गणेशोत्सव साजरा करताना एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना आपण बुद्धीचा, अगदी साध्या कॉमन सेन्सचाही वापर का करत नाही? परंपरेचा अभिमान मोठ्या आवाजात सांगणारे अनेक जण उत्सवाची खरी धार्मिक आणि पवित्र परंपरा पाळण्यात का कमी पडतात? लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले, ते समाजजागृती, संघटन आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी. त्यावेळी हा उत्सव लोकांना एकत्र आणणारा होता. व्याख्याने, कीर्तने, नाटके, देशभक्तीपर कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम हे त्याचे मुख्य आकर्षण होते. आज मात्र अनेक ठिकाणी या उत्सवाचे स्वरूप बदलले आहे. भक्तीपेक्षा दिखावा, संस्कारांपेक्षा स्पर्धा आणि श्रद्धेपेक्षा गोंगाट अधिक दिसून येतो. मोठमोठ्या मूर्ती, प्रचंड मंडप, लाखो रुपयांची रोषणाई, डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि वाहतूक कोंडी हे अनेक ठिकाणी गणेशोत्सवाचे नवे चित्र बनले आहे. विघ्नहर्त्याचे स्वागत करताना आपणच समाजासाठी नवी विघ्ने निर्माण करतो. रुग्णालयाजवळ मोठ्या आवाजात संगीत वाजवले जाते, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो, वृद्ध आणि लहान मुलांना त्रास होतो. हा उत्सवाचा हेतू निश्चितच नाही. धर्मग्रंथांमध्ये गणेशपूजेसाठी साधेपणा, शुचिर्भूतपणा आणि सात्त्विकतेला महत्त्व दिले आहे. मातीची मूर्ती, दूर्वा, फुले, मोदक आणि भक्तिभावाने केलेली पूजा हीच खरी परंपरा आहे. पण आज प्लास्टर ऑफ पॅरिसच्या भव्य मूर्ती, रासायनिक रंग आणि पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या सजावटींचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. विसर्जनानंतर नद्या, तलाव आणि समुद्रात निर्माण होणारे प्रदूषण पाहिले की प्रश्न पडतो निसर्गाची निर्मिती करणाऱ्या ईश्वराच्या पूजेत आपण निसर्गाचाच अपमान करत नाही ना? परंपरेचा अभिमान असणे चुकीचे नाही; उलट तो असायलाच हवा. पण परंपरा म्हणजे केवळ बाह्य स्वरूप नाही. परंपरा म्हणजे तिच्यामागील मूल्ये जपणे. गणेशोत्सवाने आपल्याला संयम, सहकार्य, स्वच्छता, दान, सेवा आणि समाजहित शिकवले पाहिजे. अनेक मंडळे रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, पुस्तक वाटप आणि सामाजिक जनजागृतीचे उपक्रम राबवतात. हीच खरी गणेशभक्ती आहे. दुर्दैवाने अशा उपक्रमांपेक्षा डीजेच्या स्पर्धा आणि भव्य सजावटींची अधिक चर्चा होते. साधा कॉमन सेन्स वापरला तर अनेक समस्या सहज टाळता येतील. मिरवणूक काढताना रुग्णवाहिकेला मार्ग देणे, आवाजाची मर्यादा पाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पर्यावरणपूरक मूर्ती निवडणे आणि इतरांच्या शांततेचा आदर करणे या गोष्टींसाठी मोठ्या उपदेशाची गरज नाही. हा सामान्य माणुसकीचा आणि विवेकाचा भाग आहे. विशेषतः तरुण पिढीची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. गणेशोत्सव हा ऊर्जा आणि उत्साहाचा सण आहे; पण त्या ऊर्जेला योग्य दिशा मिळाली पाहिजे. सोशल मीडियावर रील्स बनवण्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबवणे, अनावश्यक खर्चाऐवजी गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे किंवा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घेणे ही गणेशभक्ती अधिक अर्थपूर्ण ठरेल.

# मनुस्मृती कुणी जिवंत ठेवली?




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले. त्या कृतीमागे केवळ एका ग्रंथाचा निषेध नव्हता, तर सामाजिक विषमता, जातिभेद आणि अन्यायकारी व्यवस्थेविरोधातील तीव्र भूमिका होती. बाबासाहेबांनी पुढे भारतीय संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा मार्ग देशासमोर ठेवला.

मग प्रश्न असा आहे की, मनुस्मृतीचा विचार आजही आपल्या चर्चेच्या केंद्रस्थानी का आहे?

मनुस्मृती संपविण्याचे काम केवळ तिच्यावर टीका करून होणार नाही. तिच्या विचारांना पर्याय असलेल्या संविधानिक मूल्यांना समाजजीवनात रुजवणे आवश्यक आहे. मात्र गेल्या अनेक दशकांत आपल्या सार्वजनिक चर्चेत 'मनू' आणि 'मनुस्मृती'चा उल्लेख वारंवार होत राहिला; परंतु बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या अंमलबजावणीसाठी आणि संविधानिक राजकीय-सामाजिक व्यवस्था उभारण्यासाठी अपेक्षित तेवढे काम झाले का, हा आत्मपरीक्षणाचा प्रश्न आहे.

विशेषतः बहुजन समाजातील नेतृत्वाने केवळ विरोधाच्या राजकारणात अडकून न राहता शिक्षण, संघटन, राजकीय प्रतिनिधित्व, आर्थिक स्वावलंबन आणि संविधानिक हक्क यावर अधिक गांभीर्याने काम करण्याची गरज आहे.

मनुस्मृतीला पर्याय म्हणून बाबासाहेबांनी आपल्याला भारतीय संविधान दिले. त्यामुळे आजची खरी लढाई मनुस्मृतीच्या नावाचा वारंवार उच्चार करण्याची नसून, तिच्या विषमतावादी मूल्यांना समाजातून हद्दपार करून संविधानाची समतावादी मूल्ये प्रत्यक्ष जीवनात रुजविण्याची आहे. ज्यांना आपण बहुजन म्हणतो, त्यातील मोठ्या वर्गाला मनुस्मृतीचा ग्रंथ प्रत्यक्ष पाहिलेला किंवा वाचलेला नसेल. त्यामुळे केवळ 'मनुस्मृती' या शब्दाभोवती राजकीय आणि सामाजिक चर्चा घडवून आणण्यापेक्षा संविधान काय सांगते, आपले अधिकार काय आहेत आणि त्या अधिकारांसाठी संघटितपणे कसे लढायचे, याची जाणीव निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

बाबासाहेबांचे नाव घेणे सोपे आहे; पण बाबासाहेबांचा विचार जगणे, संविधान समजून घेणे आणि त्यासाठी संघटितपणे काम करणे ही खरी जबाबदारी आहे. मनुस्मृतीचा इतिहास समजून घ्यायलाच हवा; पण भविष्य घडवायचे असेल तर आपली दिशा स्पष्ट असली पाहिजे मनुस्मृतीच्या चर्चेत अडकण्यापेक्षा संविधानाच्या विचाराला समाजाच्या केंद्रस्थानी आणणे, हाच खरा बाबासाहेबांना अभिप्रेत परिवर्तनाचा मार्ग आहे.



ॲड.कविता मुल
सामाजिक कार्यकर्त्या,
अमरावती
मो.नं.९९२१६ १६७०७

# दुनिया खोट्याचा बाजार, सत्याच्या वाटेवर काटे हजार!




आपण ज्या समाजात जगतो, त्या समाजात सत्याला मान आहे, असे आपण नेहमी म्हणतो. पण प्रत्यक्ष आयुष्यात डोकावून पाहिलं तर चित्र काहीसं वेगळंच दिसतं. अनेकदा खरं बोलणाऱ्यापेक्षा गोड बोलणाऱ्याला जवळ केलं जातं. चुकीकडे बोट दाखवणाऱ्यापेक्षा चूक झाकून ठेवणारा आपला वाटतो. आणि सत्य सांगणाऱ्या माणसाला मात्र याला प्रत्येक गोष्टीत का बोलायचं असतं? असा प्रश्न विचारला जातो.

म्हणूनच मनात एक वाक्य वारंवार येतं दुनिया खोट्याचा बाजार, सत्याच्या वाटेवर काटे हजार! हे केवळ एखाद्या व्यक्तीचं दुःख नाही, तर आपल्या सामाजिक जगण्याचं वास्तव आहे. आज आपल्या भोवती अनेक प्रकारची खोटी माहिती फिरते. कुणाबद्दल पूर्ण माहिती नसताना चर्चा होते, एखाद्या घटनेची सत्यता तपासल्याशिवाय संदेश पुढे पाठवला जातो, सोशल मीडियावरील एखाद्या पोस्टला पुरावा समजलं जातं. ज्याने मोठ्याने आणि आत्मविश्वासाने सांगितलं त्याचं खरं, अशीही मानसिकता काही ठिकाणी दिसते.

याउलट सत्य सांगणारा म्हणतो, थांबा, आधी तपासूया. आणि इथेच त्याची अडचण सुरू होते. कारण सत्याला वेळ लागतो. खोटं सोयीचं असतं, सत्य जबाबदारी मागतं खोटं बोलून एखादा प्रश्न काही काळासाठी टाळता येतो. चुकीवर पडदा टाकता येतो. स्वतःची प्रतिमा चांगली दाखवता येते. एखाद्याला खूश करता येतं.

पण सत्य स्वीकारलं की स्वतःकडेही पाहावं लागतं. आपली चूक मान्य करावी लागते. कुणाला नाराज करावं लागू शकतं. जवळच्या व्यक्तीविरुद्धही भूमिका घ्यावी लागू शकते. म्हणून सत्याचा मार्ग कठीण आहे.

आपल्या रोजच्या आयुष्यातील साध्या प्रसंगांतही हे दिसतं. कार्यालयात गैरप्रकार दिसला तर आवाज उठवणारा अडचणीचा ठरतो. समाजात एखादी चुकीची प्रथा सुरू असेल तर प्रश्न विचारणाऱ्याला परंपरा मोडणारा म्हटलं जातं. अन्यायाविरुद्ध बोललं तर ङ्गतुला काय पडलंय? असं विचारलं जातं.

पण जर प्रत्येकाने हाच प्रश्न विचारला असतामला काय पडलंय?तर समाजात बदल झाला असता का? सत्य बोलणारा प्रत्येक वेळी बरोबर असेलच असं नाही

सत्याची बाजू घेणं म्हणजे आपणच नेहमी बरोबर आहोत, असा अहंकार नव्हे. उलट सत्याचा शोध घेणाऱ्याने स्वतःच्याही मतावर प्रश्न उपस्थित केला पाहिजे. मला असं वाटतं आणि हे खरं आहे यामध्ये मोठा फरक आहे. आपलं मत चुकू शकतं. आपली माहिती अपुरी असू शकते. आपल्याकडूनही गैरसमज होऊ शकतो. म्हणूनच विचार, पुरावा आणि विवेक यांना महत्त्व देणं गरजेचं आहे.

आज समाजाला फक्त सत्य बोलणाऱ्या लोकांची नाही, तर सत्य तपासणाऱ्या लोकांचीही गरज आहे. संबंध टिकवण्यासाठी किती खोटं बोलायचं?

हा प्रश्न वैयक्तिक आयुष्यातही महत्त्वाचा आहे. कधी कधी आपण सत्य माहित असूनही शांत राहतो, कारण नातं तुटू नये असं वाटतं. काही वेळा कुणाला दुखावू नये म्हणून अर्धसत्य सांगतो. काही वेळा स्वतःची सोय म्हणून मौन स्वीकारतो.

प्रत्येक सत्य प्रत्येक वेळी, प्रत्येक पद्धतीने सांगावं असं नाही. सत्य सांगतानाही संवेदनशीलता आवश्यक आहे. पण एखाद्याच्या चुकीला कायम साथ देणं आणि नातं टिकवण्यासाठी अन्यायाकडे दुर्लक्ष करणं, हे नातं वाचवणं नसून चुकीला बळ देणं आहे.

समाज बदलतो तो प्रश्न विचारणाऱ्यांमुळे आपल्या समाजात अनेक सुधारणा सहज झालेल्या नाहीत. कुणीतरी प्रश्न विचारला म्हणून चर्चा सुरू झाली. कुणीतरी विरोध केला म्हणून अन्याय समोर आला. कुणीतरी रूढ समजुतीला आव्हान दिलं म्हणून बदलाची प्रक्रिया सुरू झाली. प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीला सुरुवातीला विरोध होतो. तिच्यावर टीका होते. कधी गैरसमज पसरवले जातात. पण त्या व्यक्तीने केवळ लोक काय म्हणतील म्हणून गप्प बसलं, तर बदलाची सुरुवातच होणार नाही. म्हणूनच सामाजिक जीवनात एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते लोकप्रिय असणं आणि योग्य असणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

कधी कधी योग्य भूमिका घेताना आपण एकटे पडतो. पण एकटेपणाची भीती वाटून चुकीच्या गर्दीत उभं राहणं यापेक्षा सत्याच्या बाजूने उभं राहणं अधिक महत्त्वाचं आहे.

शेवटी सत्याची परीक्षा वेळ घेतो खोटं काही काळासाठी जिंकू शकतं. त्याला प्रसिद्धी मिळू शकते. लोकांचा विश्वासही मिळू शकतो. पण प्रत्येक खोट्यामागे एक दिवस सत्य उभं राहतं. म्हणून सत्याच्या वाटेवर चालताना लगेच टाळ्या मिळतील, अशी अपेक्षा ठेवू नये. कौतुक मिळालं नाही म्हणून निराश होऊ नये आणि टीका झाली म्हणून आपली दिशा बदलू नये. आपली भूमिका स्वार्थासाठी आहे की समाजहितासाठी, हा प्रश्न स्वतःला सतत विचारत राहणं महत्त्वाचं आहे. आजच्या काळात सत्याची सर्वात मोठी गरज आहेघरात, समाजात, राजकारणात, शिक्षणात, माध्यमांत आणि आपल्या स्वतःच्या मनातही. खोट्याच्या बाजारात गर्दी असते. सत्याच्या वाटेवर कदाचित माणसं कमी असतील. काटेही असतील. गैरसमजही असतील. पण त्या वाटेवर चालताना निदान रात्री स्वतःच्या मनाला उत्तर देता येतं

मी जे पाहिलं तेच बोललो, जे चुकीचं वाटलं त्याला चुकीचं म्हटलं, आणि लोक काय म्हणतील यापेक्षा मला काय योग्य वाटतं याला महत्त्व दिलं. कदाचित हीच सत्याची खरी ताकद आहे.

**कारण खोट्याला गर्दी लागते;**
**सत्याला फक्त धैर्य लागतं!**



ॲड.कविता मुल
सामाजिक कार्यकर्त्या,
अमरावती
मो.नं.९९२१६ १६७०७

# निसर्गाचा कोप की मानवी लोभ?



पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही. यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

भावण हिवराळे मित्र परिवार जा.गणेशपूर यांच्या वतीने

# नि:शुल्क हयात प्रमाणपत्र तपासणी शिबिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भावण हिवराळे मित्र परिवार, जामठी गणेशपूर यांच्या वतीने श्री कॉम्प्युटर सीएससी सेंटर येथे नि:शुल्क हयात प्रमाणपत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना आणि इंदिरा गांधी वृद्ध पेन्शन योजनेतील २२५ लाभार्थ्यांची हयात प्रमाणपत्रे नि:शुल्क काढून देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या



प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. श्रावण हिवराळे यांच्या निवासस्थानी आयोजित या शिबिराला लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी माजी पं.स.सदस्य राजेंद्र केदार, समीर ठाकरे, गणेश वानखडे, सरपंच शेषराव कोल्हे, वर्षा मोरे, सुरेश सुरजुसे, भीमराव भाजीखाये, साहेबराव दुहिजोड, केशवराव वालुरकर, नामदेव बांदरे, माजी सरपंच अशोक माळोदे, हिरामण वाडबुधे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामुळे लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया गावातच विनामुल्य पुर्ण झाल्याने त्यांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले.

# राज्यात २.०६ कोटी मतदारांपैकी १७.६६ लाख दुबार मतदार : ठाण्यासह पुण्यात सर्वाधिक मतदार वगळले, एसआयआर मोहिमेच्या प्रारूप मतदार यादीतून धक्कादायक माहिती समोर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानं महाराष्ट्रात मतदार यादीचं विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ सुरु आहे.

अशातच मोहिमे अंतर्गत महाराष्ट्रातली प्रारूप मतदार यादी जाहीर झाल्यानंतर राज्यात २.०६ कोटी मतदारांपैकी १७.६६ लाख दुबार मतदार असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्यांची नोंदणी आधीच झाल्याचं एसआयआरच्या सर्वेमधून समोर आलं आहे. तर आधीच्या मतदार यादीतील ३४.८२ लाख मृत मतदारांची आकडेवारी समोर आली आहे. यासोबतच ७६.७६ लाख मतदार हे स्थलांतरित झाल्याचं एसआरमधून समोर आलं आहे. सर्वाधिक मतदार पुणे अन ठाण्यामधून वगळले मिळालेल्या माहितीनुसार, प्रारूप मतदार यादी जाहीर झाल्यानंतर सर्वाधिक मतदार पुण्यामध्ये आणि ठाण्यामध्ये २८ लाख मतदार वगळले गेले आहेत. त्यापाठोपाठ मुंबई उपनगरात २६ लाख मतदार वगळले गेले आहेत.त्या खालोखाल पुणे, नागपूर, मुंबई उपनगर, सोलापूरमध्ये सुद्धा एक लाखांपेक्षा अधिक दुबार मतदार आढळले आले असून ज्यांची नोंदणी करण्यात आली होती.

अमरावती राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयात

# सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क : माहिती फलकाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – नागरिकांना शासकीय सेवा विहित कालावधीत, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने मिळाव्यात, यासाठी लागू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' या कायद्याची व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहिती फलकाचे लोकार्पण अमरावती परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.महेश पाटील आणि राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही पारदर्शक प्रशासन आणि सुशासनासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे



प्रतिपादन केले.

कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या या माहिती फलकामध्ये नागरिकांना शासकीय सेवा मिळिवण्याची संपूर्ण प्रक्रिया फ्लोचार्टच्या माध्यमातून सोप्या व सुटसुटीत पद्धतीने समजावून सांगण्यात आली आहे. पात्र व्यक्तीने अर्ज केल्यानंतर सेवा नाकारली गेल्यास किंवा विहित कालावधीत सेवा मिळाली नाही, तर संबंधित व्यक्तीस ३० दिवसांच्या आत प्रथम अपील दाखल करता येते. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयावर समाधान न झाल्यास पुढील ३० दिवसांत द्वितीय अपील, तर त्यानंतर ६० दिवसांच्या आत तृतीय अपील राज्य सेवा हक्क आयोगाकडे दाखल करण्याची तरतूद आहे.

शासकीय सेवा देण्यास विनाकारण विलंब करणाऱ्या अथवा सेवा नाकारणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर रु. ५०० ते रु. ५ हजारांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क असून, सेवा देणे ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून कायदेशीर कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला.

या कार्यक्रमास विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव, अपर आयुक्त (महसूल) अनिल खंडागळे, उपजिल्हाधिकारी विवेकानंद काळकर, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाचे उपसचिव (प्र.) देवेंद्र चव्हाण, कक्ष अधिकारी क्षितिज लेंडे, सहायक कक्ष अधिकारी द्विपाल वानखडे, महसूल सहायक सुजित सरोदे व प्रिती शिंगाडे यांच्यासह राज्य सेवा हक्क आयोग व विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहांसाठी भाडेतत्वावर इमारत उपलब्ध करूण देण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी अंतर्गत अमरावती शहरातील आदिवासी मुलांच्या तीन वसतिगृहांच्या मंजूर क्षमतेमध्ये वाढ झाल्याने नवीन सुसज्ज इमारतीसाठी भाडेतत्वावर येत्या सात दिवसात प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

गाडगेनगर स्थित आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह क्र.१च्या मंजूर क्षमतेत वाढ होवून १०० विद्यार्थी झाली आहे. राठीनगर



स्थित आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह क्र. २ ची विद्यार्थी क्षमता वाढून १२५ झाली आहे आणि दस्तुरनगर येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह क्र. ३ ची क्षमता वाढून १८० झाली आहे. या तिन्ही वसतिगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या निवासासाठी नवीन, सुरक्षित व सुसज्ज इमारत भाडेतत्वाने घेणे आहे. या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी निवास कक्ष, कार्यालय, संगणक कक्ष, वाचनालय, अभ्यासिका, भोजनकक्ष, स्वयंपाकगृह, स्टोअर रूम, वैद्यकीय कक्ष, शौचालय व स्नानगृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज व्यवस्था, सौरऊर्जा प्रणाली, पावसाचे पाणी साठवण व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा व्यवस्था, वाहनतळ तसेच आवश्यक फर्निचर व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्यात.

ही इमारत अमरावती शहाराच्या मध्यवर्ती व शैक्षणिक परिसराच्या जवळ असावी. इच्छुक इमारत मालकांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी या कार्यालयात किंवा अमरावती येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहातील गृहप्रमुख किंवा गृहपालास कार्यालयीन वेळेत येत्या सात दिवसात कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास धारणी कार्यालयाचे सहायक प्रकल्प अधिकारी (वसतीगृह) यांनी केले आहे.

# एक्स्प्रेसमध्ये दिवा लावून पूजा करणाऱ्या प्रवाशावर कारवाई

आरोपीवर विविध कलमांनुसार कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – हजरत निजामुद्दीन-म्हैसूर एक्स्प्रेसमध्ये दिवा लावून प्रवाशांच्या



सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या एका प्रवाशावर मध्य रेल्वेने कारवाई केली आहे. या आरोपीवर विविध कलमानुसार कारवाई करून नोटीस देण्यात आली आहे.

गाडी क्रमांक १२७८२ हजरत निजामुद्दीन-म्हैसूर एक्स्प्रेसच्या कोच ए-१ मधील बर्थ क्रमांक १७ वर एका प्रवाशाने दिवा लावून पूजा केल्याबाबत भुसावळ येथील कमर्शियल कंट्रोलकडून माहिती मिळाली. खंडवा येथील कर्तव्यावर असलेले तिकीट तपासनीस रमन कुमार शर्मा यांनी या घटनेची माहिती दिली. पुढील आवश्यक कारवाईसाठी त्या प्रवाशा-ला भुसावळ रेल्वे स्थानकावर गाडीतून खाली उतरवण्यात आले. चौकशीदरम्यान, गरिबा (वय ५५) असे या प्रवाशाने सांगितले की, सायंकाळची प्रार्थना करताना त्याने आपल्या आरक्षित बर्थवर दिवा लावला होता. कर्तव्यावर असलेल्या टीटीईने त्याला दिवा विझवण्याचा सल्ला दिला होता आणि समजावून सांगितले होते की, उघड्या ज्योतीमुळे आग लागू शकते आणि प्रवाशांच्या तसेच रेल्वेच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो.

अल्पवयीन युवतीला फुस लावुन पळवुन नेल्या प्रकरणी

# शनिवार पेठ परिसरात एकाविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – अल्पवयीन युवतीला फुस लावुन पळवुन नेल्या प्रकरणी वरुड पोलिसांनी एकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी प्रविण बरडे व त्याची पत्नी ही सकाळी १०.३० वा कामावर गेले व रात्री ८.३० वा दरम्यान कामावरुन घरी परत आले असता त्यांची मुलगी ही घरी




दिसली नाही. घरमालक अतुल माकोडे व त्यांची पत्नीला विचारपुस केली असता तीला दुपारी ३.३० वा घरी बघितले परंतु त्यांनतर ती कोठेही दिसली नाही, असे सांगीतले. आजुबाजुला तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला परंतु ती कोठेही मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने कशाचे तरी आमिष दाखवुन पळवुन नेले असावे, असा संशय आहे. या प्रकरणी अल्पवयीन युवतीचे वडिल प्रविण बरडे (४७) रा.शनिवार पेठ वरुड यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुध्द कलम १३७ (२) बिएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

विविध क्रीडा व इंग्लिश हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन

# मेजर ध्यानचंद जयंती निमित्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल, वरुड येथे हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध क्रीडा स्पर्धा तसेच इंग्लिश हॅन्ड रायटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ए.बी.चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणुन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद अशोक घोरमाडे उपस्थित होते. यावेळी विविध क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा अभिनंदन व सत्कार सोहळा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय



योगदानाबद्दल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना साहित्यिकांविषयी माहिती देण्यात आली. साहित्यिका व साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदाना विषयीची माहिती बढे यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी इंग्लिश हॅन्ड रायटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रिडाभावना, सर्जनशीलता, सुंदर हस्ताक्षर तसेच साहित्याविषयी आवड निर्माण होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचे संचालन व आयोजन एस.एस.ठाकरे यांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा व हस्ताक्षर स्पर्धांमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

# अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना बँकिंग व करिअर मार्गदर्शनाची गरज

उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यशाळेत तज्ज्ञांचे मार्गदर्शन : विद्यार्थ्यांसाठी विविध करिअर संधींवर भर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जरुड** – अकरावी व बारावी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. या काळात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित न करता आपल्या आवडी, क्षमता आणि भविष्यातील करिअरच्या संधी यांचा विचार करुन योग्य दिशा निवडणे आवश्यक आहे.

यासाठी विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शैक्षणिक माहिती आणि करिअर नियोजनाची गरज आहे. असल्याचे मत उत्क्रांती नागरी सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांनी सहकारी प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यशाळेत व्यक्त केले. अकरावीमध्ये



प्रवेश घेतल्यानंतर कला शाखेत देखिल व्यावसायिक संधी अभ्यासक्रमांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांची माहिती विद्यार्थ्यांनी करुन घ्यावी. बारावीनंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, फार्मसी, व्यवस्थापन, संगणक क्षेत्र, कायदा, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, संरक्षण सेवा, बँकिंग तसेच विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. प्रा.जयश्री फुसे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले. विद्यार्थ्यांनी केवळ मित्र किंवा नातेवाईकांच्या सल्ल्यावर करिअरची निवड न करता स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्यातील उद्दिष्टे लक्षात घेऊन निर्णय घ्यावा.तसेच प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना, अभ्यासक्रमांची पात्रता, प्रवेश प्रक्रिया आणि रोजगाराच्या संधी यांची माहिती वेळेत मिळवणे आवश्यक आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांवर अनावश्यक दबाव न टाकता त्यांच्या आवडी व क्षमतेला प्रोत्साहन द्यावे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षेची तयारी आणि करिअरच्या विविध पर्यायांबाबत उत्क्रांती शाखा व्यवस्थापक रविंद्र वसुले यांनी बँकेतील व्यवहारा बद्दल मार्गदर्शन केले. उद्याचे उज्ज्वल भविष्य या उद्देशाने अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी नियमित करिअर मार्गदर्शन व माहितीपर उपक्रम आयोजित करण्याची गरज आहे. योग्य वेळी मिळालेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास निश्चितच मदत करेल, असेही ते म्हणाले, यावेळी ११ वी व १२ वी कला शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विक्रमगड विधानसभेत २६ हजार ६५८ मतदार वगळले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जव्हार** – एसआयआर (विशेष सखोल पुनरीक्षण) मोहिमेंतर्गत विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीची पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. निवडणूक विभागाने सोमवारी (दि.३१) मतदारांची प्रा?रुप यादी प्रसिद्ध केली. एसआयआर २०२६ लागू होण्यापूर्वी मतदारसंघात ३ लाख १५ हजार ७२९ मतदार होते. त्यापैकी २६ हजार ६५८ मतदार वगळण्यात आल्याने आता मतदारसंख्या २ लाख ८९ हजार ७१ झाली आहे, अशी माहिती निवडणूक नायब तहसीलदार वसंत सांगळे यांनी दिली.



एसआयआर मोहिमेंतर्गत ३० जून ते १८ ऑगस्टदरम्यान विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील ३७१ मतदान केंद्रांवर मतदारांची पडताळणी करण्यात आली. यासाठी मतदार नोंदणी अधिकारी व १५ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, तसेच मतदान केंद्रनिहाय केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. बीएलओंनी मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन केले. त्यानंतर अर्जांचे डिजिटलायझेशन करून मतदारांची माहिती पडताळण्यात आली.

पडताळणीदरम्यान पत्त्यावर न सापडलेले, कायमस्वरूपी स्थलांतरित, मृत तसेच दुबार मतदारांच्या नोंदी तपासण्यात आल्या. त्यानुसार १० हजार ७५९ मयत मतदार, ७४३ पत्त्यावर न आढळलेले मतदार, ११ हजार ५२३ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, ३ हजार ४९१ दुबार मतदार आणि १४२ इतर नोंदी वगळण्यात आल्या आहेत.विक्रमगड विधानसभा मतदारसंघात जव्हार, मोखाडा व विक्रमगड तालुक्यांसह वाडा तालुक्यातील काही भागाचा समावेश आहे. विविध कारणांमुळे मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या; मात्र मतदारसंघात वास्तव्यास असलेल्या नागरिकांना पुन्हा नावनोंदणीची संधी देण्यात आली आहे. दरम्यान, वगळलेल्या मतदारांसह मतदार यादीबाबत इतर दावे व हरकती नोंदवण्यासाठी १ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर या कालावधीत अधिकाऱ्यांकडे अर्ज करता येणार आहे. १०,७५९ पत्त्यावर न आढळलेले मतदार : ७४३ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार : ११,५२३ दुबार मतदार : ३,४९१ एकूण वगळलेले मतदार : २६,६५८.

### न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे

# रक्षाबंधन निमित्ताने राखी मेकिंग स्पर्धा उत्साहात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**लोणी** – येथील नामांकित न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे रक्षाबंधन सणाचे औचित्य साधुन राखी मेकिंग स्पर्धा अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

या स्पर्धेत पूर्व आणि प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेत स्वतःच्या हाताने अत्यंत सुंदर आणि आकर्षक राख्या तयार करुन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. या विशेष कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन कल्पना देवघरे व निकिता नेरकर उपस्थित होत्या तर मुख्याध्यापिका जया बारमासे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होत्या. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या हाताने बनवलेल्या राख्यांचे आणि त्यांच्या कल्पकतेचे भरभरुन कौतुक केले.




या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या राखी मेकिंग स्पर्धेत दोन्ही विभागांतील पुर्व-प्राथमिक विभागामधुन प्रथम क्रमांक कृपा गोरडे, द्वितीय आराध्य दवंडे, तृतीय ज्ञानार्थी कुबडे, प्राथमिक विभाग प्रथम क्रमांक जान्हवी तिखे, द्वितीय धनश्री काळमेघ, तृतीय स्वरा चिंचमलातपुरे हिने प्राप्त केला.

सर्व विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांचे मुख्य पाहुणे आणि मुख्याध्यापिका यांच्या हस्ते कौतुक करुन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन दामिनी पाचपोहर व वृषाली कुबडे यांनी केले.

### पी.एम.श्री जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक कन्या शाळा येथील सहाय्यक शिक्षिका

# मीना सोनकुसळे राष्ट्रगौरव पुरस्काराने सन्मानित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – पुसला येथील पी.एम.श्री जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक कन्या शाळा येथील सहाय्यक शिक्षिका मीना विजय सोनकुसळे यांना राष्ट्रगौरव पुरस्कार २०२६ प्रदान नुकताच प्रदान करण्यात आला.

बिग बॉस फेम तृप्ती देसाई यांच्या हस्ते व शशिकांत चव्हाण याच्या विशेष उपस्थितीत हा पुरस्कार मीना सोनकुसळे यांना प्रदान करण्यात आला.



कलाजीवन बहुउद्देशीय संस्था ढगा यांच्या वतीने आयोजित राष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्यात मीना सोनकुसळे यांना शैक्षणिक क्षेत्रात व सामाजिक कार्यात विशेष प्रगती केल्याबद्दल सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. आळंदी येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात मीना सोनकुसळे यांना तृप्ती देसाई यांच्या हस्ते सन्मान पत्र आणि शिल्ड देऊन गौरविण्यात आले.

राज्यपाल पुरस्कार प्राप्त डॉ.अल्का नाईक, अध्यक्ष डॉ.युवराज ठाकरे, बॉलीवुड सिने अभिनेत्री रुपाली पवार, ॲड.रमेश राठोड, डॉ.शशिकांत चव्हाण यांची विशेष उपस्थिती होती. कलाजीवन व बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी राष्ट्रगौरव पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.

या पुरस्कारामुळे मीना सोनकुसळे यांच्या कार्याचा सन्मान झाला असुन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पं.स.गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांच्या सततच्या प्रोत्साहन आणि कौतुकामुळे हे सर्व शक्य झाले तसेच पी.एम.श्री जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक कन्या शाळा पुसला येथील मुख्याध्यापक भगवंत गजभिये यांचे सतत प्रोत्साहनमुळे मला हा पुरस्कार प्राप्त झाला. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# तिवसाघाटच्या गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालयात राखी स्पर्धा उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी राखी तयार करणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा तसेच प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध रंग, आकर्षक साहित्य व कल्पकतेचा वापर करून सुंदर राख्या तयार केल्या.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कला कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षण शिक्षकांनी केले. उत्कृष्ट राखी तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले व त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक सुधीर श्रीराव, शिक्षक ममता खासबागे, सतीश नेरकर, कुमुद भोरकर व शिक्षकेत्तर कर्मचारी हेमंत चौकडे, हिरेन्द्र देसली उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अशा उपक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# किंचाळले, गयावया केली पण दया आली नाही! : जमिनीच्या वादातून वृद्ध आई वडिलांना मारहाण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**इंदापूर** – जमिनीच्या वादातून ६५ वर्षीय आई-वडिलांना लाकडी काठ्यांनी मारहाण केल्याप्रकरणी दोन मुलांविरोधात इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते ६.३० वाजण्याच्या सुमारास सलीम लॉन्सजवळील तरंगवाडी परिसरात ही घटना घडल्याची माहिती आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, तुकाराम किसान राऊत आणि त्यांची पत्नी अंजना राऊत हे रस्त्यावरून जात असताना त्यांचे मुलगे संजय तुकाराम राऊत आणि राजेंद्र तुकाराम राऊत हे कथितरित्या टाटा नेक्सोन गाडीतून तेथे आले. दोघांनी आईच्या नावावर असलेल्या जमिनीवरून आई-वडिलांना जाब विचारला.

# लेकींच्या शिक्षणासाठी ४७ वर्षीय आईची अनोखी जिद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – मुलांच्या भविष्यासाठी आई कोणत्याही संकटाला सामोरं जाण्यास तयार असते, याचं प्रेरणादायी उदाहरण पुण्यात समोर आलं आहे. ४७ वर्षीय रामाबाई रणवीर यांनी आपल्या दोन मुलींच्या शिक्षणासाठी चक्क अनवाणी ३ किलोमीटर धावत शर्यत जिंकली.



विशेष म्हणजे, आयुष्यात पहिल्यांदाच त्या धावण्याच्या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

Change in Name

Old Name
Abhishek Sandip
Karale

New Name
Abhishek Sandiprao
Karale

- Address -
At.Porgavhan, Po.
Ganeshpur, Tq.warud,
Dist Amravati 444906

# विविध स्पर्धांचे आयोजन व खेळाडूंचा गौरव करत क्रीडादिन साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान विविध क्रीडा स्पर्धा, सायकल रॅली आणि खेळाडूंचा गौरव करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्याने 'एक घंटा खेल के मैदान मे' या संकल्पनेवर आधारीत विशेष क्रीडा उपक्रमाचे २८ ऑगस्ट रोजी उद्घाटन करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी येथील विभागीय क्रीडा संकुलात



बॅडमिंटन,टेबल टेनिस, स्क्वॅश, आर्चरी, व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात क्रीडा उपसंचालक अविनाश पुंड यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह आणि सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक



जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले. शिव छत्रपती पुरस्कारार्थी नितीन चव्हाळे, मंगेश व्यवहारे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमांतर्गत ३० ऑगस्ट रोजी विभागीय क्रीडा संकुल येथून 'संडे ऑन सायकल, रन अँड राईड' या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. आमदार संजय खोडके आणि राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त पराग नवलकर यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकस्वारांना रवाना केले.

अमरावती सायकलींग असोसिएशनचे सायकलपटू, खेळाडू, नागरीक, युवक-युवती या सायकल रॅलीमध्ये मोठया संख्येने सहभागी झाले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४८/२०२६** **ने.ता.०७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती विमल मारोतराव नवले, वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती
२) कमलेश मारोतराव नवले, वय अं.४१ वर्ष, धंदा- मजुरी
३) निलेश मारोतराव नवले, वय अं.३९ वर्ष, धंदा- शेती

क्र.१ ते ३ रा.वार्ड क्र.३ पेठ, बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मारोतराव भिमरावजी नवले, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ५० लाखांच्या खंडणीसाठी भरदिवसा बांधकाम व्यावसायिकाचे अपहरण

## अवघ्या आठ तासात हाय प्रोफाईल अपहरणाचा उल्हासनगर पोलिसांकडून छडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**उल्हासनगर** – उल्हासनगर मधील एका बांधकाम व्यवसायिकाचे ५० लाखांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आले.

याप्रकरणी उल्हासनगर पोलिसांच्या विशेष पथकाने व्यवसायिकाची सुटका करून एकाला अटक केली. अपहरणादरम्यान रेकी करणारे अन्य दोन अपहरणकर्ते सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झालेत.



दरम्यान या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांचा तपास सुरू आहे.

मात्र या घटनेनं परिसरात मोठी खळबळ उडाली असून यातील सूत्रधार शोधून काढणं आता पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे. मिळालेल्या माहिती नुसार, उल्हासनगरमधील नामांकित बांधकाम व्यवसायिक आणि इस्टेट एजंट जयराम नेहलानी यांचे सोमवारी सकाळी भर दिवसा अपहरण झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी आठ तासात अपहरण नाट्याचा छडा लावला.

खडवली येथून नेहलांनी यांची सुटका करण्यात पोलिसांना यश आले. अपहरणा दरम्यानची रेकी गोल मैदानातील एका सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. भर दिवसा घडलेल्या या हाय प्रोफाईल अपहरणाचा थरार यात पांढऱ्या आणि काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून आलेल्या इसमांनी नेहलांनी यांना जबरदस्तीने गाडीत घालून पळवून नेले. भर दिवसा घडलेल्या या हाय प्रोफाईल अपहरणाच्या घटनेने खळबळ उडाली होती.

# सोने खरेदी टाळा : पंतप्रधान नरेंद्र मोदींचे पुन्हा आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – जागतिक पातळी वरील उलथापालथ, भू-राजकीय संघर्ष आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर ७.८ टक्के जीडीपी गाठल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी देशातील जनतेचे कौतुक केले. विकास दराची ही गती कायम ठेवायची असल्यास परदेशी न जाण्याचे, परदेशात लग्नसमारंभ न आयोजित करण्याचे किंवा सोने न खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी केले. लोकांनी भारतातच लग्न सोहळे आयोजित करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मोदी यांनी राहुल गांधी यांच्या 'छात्रो की गूंज'वर 'झूठ की गूंज' असे म्हणत जोरदार निशाणा साधला. या नवीन जीडीपी वृद्धी दराने भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल पसरवल्या जाणाऱ्या 'निराशावादाचा' बुरखा फाडला आहे.

## वाडेगांव येथील संजय नागदिवे यांच्या शेतातील

# जुगार अड्ड्यावर धाड : तीन अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वाडेगाव शेतशिवारामधील संजय नागदिवे यांच्या शेतातील संत्र्याच्या झाडाखाली बसून ५२ पत्यांचा एक्का बादशा हा जुगार सुरु असल्याची माहिती पथकाला प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे त्यांनी शुक्रवारी सायंकाळी या जुगारावर धाडसत्र राबविले. यावेळी अब्दुल काझी अब्दुल रजाक (४६) रा.नरखेड जि.



नागपूर, किसना भोंडे (४५) व हेमंत भोंडे (४०) दोघेही रा.वाडेगाव यांना ताब्यात घेण्यात आले.


यांच्या ताब्यातुन नगदी ९ हजार १०० रोख रक्कम सह एकूण ४१ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संजय साबळे, तेजस मांगुळकर, विलास भोपचे (सर्व रा.वाडेगाव) व आसिफ बाबा रा.नरखेड अशी जुगारावरून पळून जाणाऱ्यांची नावे आहेत. इतर पसार झालेल्या आरोपींची नावे पोलिसांना कळू शकले नाही. स्थानिक गुन्हे शाखेचे संदीप वानखडे यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध जुगार ॲक्टनुसार गुन्हे दाखल केले आहे.

# कुकडी प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांची तरतूद

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मंजुरी देतानाच या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.



कुकडी पाटबंधारे प्रकल्प येडगाव, माणिकडोह, वडज, डिंभे आणि पिंपळगाव जोगे या पाच धरणांचा संयुक्त प्रकल्प आहे. या पाच धरणांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३०.५२ टीएमसी असून प्रकल्पाचा पाणीवापर ३९.३६ टीएमसी इतका आहे. प्रकल्पामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या सात टंचाईग्रस्त तालुक्यांतील एकूण १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

दरसूचीतील वाढ, जादा दराच्या निविदांची स्वीकृती, भूसंपादनाच्या खर्चातील वाढ, विशेषतः नवीन भूसंपादन कायद्यामुळे झालेली वाढ, संकल्पचित्रातील बदल, नवीन अथवा वगळलेल्या तरतुदी, अपुऱ्या तरतुदी तसेच अन्य अनुषंगिक खर्चामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक समितीने प्रस्तावाची छाननी केल्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने हा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता. पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मंजुरी देतानाच या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

# गुंतवणूक, आर्थिक विकासाला चालना मिळण्याचा मुख्यमंत्र्यांचा विश्वास

## जमिनीचा 'सर्च रिपोर्ट' एका क्लिकवर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला.

महसूल आणि वन विभागाकडून विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीची महाभूमी स्टॅक प्रणालीचा मंगळवारी




राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याविषयी सादरीकरण केले. त्यावेळी बोलताना फडणवीस यांनी राज्याच्या महसूल आणि जमिन विषयक सुधारणामधील हा अतिशय महत्वाचा टप्पा असल्याचे नमूद केले.

जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते.

या सर्व विखुरलेल्या प्रणालीचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे फडणवीस म्हणाले.

महाभूमी स्टॅक प्रणाली अभिलेखांचे डिजिटल भांडार साडेतीन कोटींहून अधिक अधिकार अभिलेख (७/१२ आणि ८-अ) दीड कोटीहून अधिक भू-नकाशे आणि मिळकत पत्रिका ४० कोटींहून अधिक ऐतिहासिक स्कॅन केलेले फेरफार आणि जुने अभिलेख नोंदणी विभागाचे दस्त क्र.२ (इंडेक्स -२) च्या प्रती आणि महसूल न्यायालयीन प्रकरणांची अद्ययावत स्थिती महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला.

